311 (2)

**विशेष अहवाल**

**(Special Report)**

प्रति :- मा.महासंचालक, ला.प्र.वि.म.रा.मुंबई.

माहितीस्तव :-मा.पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.ओरंगाबाद.

:- मा.आयुक्त महानगरपालीका औरंगाबाद शहर

:- मा.अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.औरंगाबाद.

पासुन :- पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.औरंगाबाद.

---

जा. क्र. अे.सी.बी./सापळा/औ.बाद/00/2023 - औरंगाबाद, दिनांक 10/05/2023 — 1880

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | पो.स्टे. गु.र.नं. व कलम | :- | पो.स्टे.जवाहरनगर औरंगाबाद शहर गु.र.नं.व कलम 112/2023 कलम 7 व 12 भ्र.प्र. अधि.1988. |
| 2 | फिर्यादीचे नाव | :- | सुजितकुमार उत्तमराव फुलवरे वय 53 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-क्राईम फोटोग्राफर, रा.घर क्र. क्यु 10/7, तथागत कॉलोनी, एन-2 सिडको, धुत हॉस्पीटल जवळ, औरंगाबाद |
| 3 | आरोपीचे नाव | :- | 1)श्री.सुरेंद्र रमेशराव रुपदे वय 34 वर्षे, पद-वसुली कर्मचारी , कंत्राटी कर्मचारी वार्ड क्रमांक 8, मनपा औरंगाबाद, रा. ए-20/01, 11 वी योजन, शिवाजीनगर औरंगाबाद<br>2) प्रदिप शिवराम गराडे वय 33 वर्षे, पद-वसुली कर्मचारी, वार्ड क्रमांक 8, मनपा औरंगाबाद, रा.सिएल-5-362, 12 वी योजना शिवाजीनगर औरंगाबाद |
| 4 | गु.घ.ता.वेळ ठिकाण | :- | दिनांक 09/05/2023 रोजी 16:55 वा करसंकलन कार्यलय मनपा शहानुरवाडी ,वार्ड क्रं 8 मयुनबन कॉलनी ,औरंगाबाद |
| 5 | गु.दा.ता.वेळ, ठिकाण | :- | दिनांक 10/05/2023 रोजी 01:04 वजता |
| 6 | लाच मागणी रक्कम | :- | 3000/-रुपये |
| 7 | स्विकारली /जप्त केलेली लाचेची रक्कम | :- | 3000/-रुपये |
| 8 | आरोपी अटक तारिख वेळ | :- | दिनांक 10/05/2023 रोजी 01:41 वाजता |
| 9 | तपास अधिकारी | :- | श्रीमती रेशमा सौदागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |

**खुलासा** :-

सविनय सादर विनंती की, वर नमुद गुन्हयातील तक्रारदार सुजितकुमार उत्तमराव फुलवरे वय 53 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-क्राईम फोटोग्राफर, रा.घर क्र. क्यु 10/7, तथागत कॉलोनी, एन-2 सिडको, धुत हॉस्पीटल जवळ, औरंगाबाद यानी डिसेंबर 2016 मध्ये ऐशियाड -2, गट नं. 119, देवळाई परिसर औरंगाबाद या ठिकाणी प्लॉट नं. 99 त्याच्या नावे खरेदी केला होता. सदर प्लॉटवर तक्रारदार. याना घराचे बांधकाम करणे असल्याने त्या करिता वार्ड कार्यालय क्रं. 8 येथुन टॅक्स पावती बांधकाम विभाग म.न.पा.औरंगाबाद येथे दाखल करणे आवश्यक असल्याने तक्रारदार. यानी दिनांक दि.28/03/2023 रोजी टॅक्स पावती मिळावी म्हणुन एक लेखीअर्ज कागदपत्रासह वार्ड अधिकारी, वार्ड क्र. 8 मनपा औरंगाबाद कार्यालयास सादर केला होता. सदरचे काम कार्यालयातील कर्मचारी श्री. प्रदिप गराडे यांचेकडे असल्याने तक्रारदार. यानी त्याच दिवशी त्यांची समक्ष भेट घेवुन टॅक्स पावती लवकरात लवकर तयार करुन देण्या बाबत विनंती करुन त्यांना संपर्क करण्या करिता तक्रारदार यानी त्यांचा मोबाईल क्रमांक 9673148979 घेतला होता. त्यानंतर तक्रारदार यानी वेळोवेळी श्री. प्रदिप गराडे यांचेशी संपर्क साधुन प्लॉटची टॅक्स पावती देण्या संदर्भात

विनंती करत होते. दरम्यान कालावधीत तक्रारदार यांच्या आर्किटेक कडुन प्लॉटच्या बेबाकी प्रमाणत्राचीही अवश्यकता असल्याचे तक्रारदार याना सांगण्यात आले होते.

दिनांक 03/05/2023 रोजी सकाळी श्री. प्रदिप गराडे यानी तक्रारदार याना फोन केला व त्यांनी तक्रारदार याना कार्यालयात भेटण्यास बोलावले त्यावरुन तक्रारदार हे वार्ड क्र. 8 मनपा. कार्यालय औरंगाबाद येथे जावुन श्री. प्रदिप गराडे यांची समक्ष भेट घेतली व त्यांना तक्रारदार यानी टॅक्स पावती बरोबरच बेबाकी प्रमणपत्र ही हवे असल्याचे तोंडी सांगितले त्यावर श्री. प्रदिप गराडे हे तक्रारदार याना म्हणाले की, मी टॅक्स पावती व बेबाकी प्रमाणपत्र दोन्ही तयार करुन देतो त्या करिता दोन्ही कामाचे मिळुन मला 8000/-रुपये लागतील त्यात टॅक्स पावती तयार असुन त्याचे 5000/-रुपये आता दयावे लागेल असे म्हणाले. तक्रारदार याना टॅक्स पावतीची अवश्यकता असल्याने तक्रारदार यानी श्री. प्रदिप गराडे याना 5000/-रुपये देवुन प्लॉटची टॅक्स पावती घेतली .

टॅक्स पावती मिळाल्या नंतर दि.04/05/2023 रोजी तक्रारदार यानी वार्ड अधिकारी, वार्ड क्र. 8 मनपा औरंगाबाद कार्यालयास बेबाकी प्रमाणपत्र मिळण्या करिता परत एक लेखी अर्जासह कागदपत्र दाखल करुन एक ओसी प्रत घेतली दिनांक 08/05/2023 रोजी तक्रारदार यानी वार्ड कर्मचारी श्री. प्रदिप गराडे यांना संपर्क करुन बेबाकी प्रमाणपत्रा बाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, उदया दिनांक 09/05/2023 रोजी तुम्ही कार्यालयात या कार्यालयातील कर्मचारी श्री.रुपदे यांना भेटा त्यांना राहिलेले 3000/- रुपये दया त्याना बेबाकी प्रमाणपत्र तुम्हाला देण्याचे सांगितले आहे असे म्हणाले. परंतु तक्रारदार याना वार्ड क्र.8 मनपा कर्मचारी श्री. प्रदिप गराडे यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि. औरंगाबाद येथे हजर येवुन तक्रार दिली. सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 09/05/2023 रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी करण्याचा आम्ही निर्णय घेतला. दिनांक 09/05/2023 रोजी यातील फिर्यादी सुजितकुमार उत्तमराव फुलवरे वय 53 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-क्राईम फोटोग्राफर, रा.घर क्र. क्यु 10/7, तथागत कॉलोनी, एन-2 सिडको, धुत हॉस्पीटल जवळ, औरंगाबाद यांनी कर्मचारी श्री. रुपदे, यांची भेट घेतली असता, रुपदे यांनी तक्रारदार याना बेबाकी प्रमाणपत्र दिले व म्हणाले की, त्यांनी 3000/-रुपये घ्यायचे सांगितले व त्यानंतर श्री. रुपदे यांनी श्री गराडे यांना फोनकरुन फोनचा आवाज स्पिकर मोडवर करुन बोलले असता श्री. गराडे हे तक्रारदार याना फोनवर म्हणाले की, श्री. रुपदे, याचेकडे 3000/-रुपये दया असे म्हणुन तक्रारदार याना 3000/-रुपये लाचेची मागणी करुन मागणी केलेली लाचेची रक्कम 3000/- रुपये हे श्री. रुपदे, यानी दिनांक 09/05/2023 रोजी 16.55 वाजता करसंकलन कार्यलय मनपा शहानुरवाडी ,वार्ड क्रं 8 मयुनबन कॉलनी ,औरंगाबाद येथे पंच साक्षीदारा समक्ष स्विकारली आहे. म्हणुन आरोपी लोकसेवक श्री.सुरेंद्र रमेशराव रुपदे वय 34 वर्षे, पद-वसुली कर्मचारी , कंत्राटी कर्मचारी वार्ड क्रमांक 8, मनपा औरंगाबाद, रा. ए-20/01, 11 वी योजन, शिवाजीनगर औरंगाबाद 2) प्रदिप शिवराम गराडे वय 33 वर्षे, पद-वसुली कर्मचारी, वार्ड क्रमांक 8, मनपा औरंगाबाद, रा.सिएल-5-362, 12 वी योजना शिवाजीनगर औरंगाबादयांनी त्यांचे लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन त्यांना मिळणा-या परिश्रमाखेरीज प्रवर्तकदान, बक्षिस म्हणुन 3000/-रुपये लाचेची रक्कम स्वत:चे अर्थिक फायदयासाठी स्विकारुन सांपत्तीक फायदा मिळविला म्हणुन नमुद लोकसेवका विरुध्द वरील प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन, त्यांना सदर गुन्ह्यात दिनांक 10/05/2023 रोजी 01.41 वाजता अटक करण्यात आली आहे. तपास पो.नि. रेश्मा सौदागर, ला.प्र.वि.औरंगाबाद या करीत आहेत.

आजपावेतो ला.प्र.वि.औरंगाबाद विभागाची सन-2023 या वर्षातील २० वी सापळा कारवाई आहे.

********

10/5/23

(मारूती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद